# महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

**Maharashtra Prathamik Shikshan Parishad**

(Govt. of Maharashtra Undertaking)


जा. क्र. मप्राशिप/सशिअ/हं.निवासी वसतिगृह/२०१७-१८/९३७५          दिनांक : 16 JUN 2017

**विषय : स्थलांतरीत मुलांच्या नियमित शिक्षणाबाबत.**

**संदर्भ : १) शासनाचे परिपत्रक क्र. मप्राशिप/सशिअ/हं.निवासी वसतिगृह/२०१५-१६/२६४३, दिनांक ०१/१०/२०१५.**

**२) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. मप्राशिप/सशिअ/हं.निवासी वसतिगृह/ २०१६-१७/२२७२, दिनांक ०२/०९/२०१६.**

स्थलांतरीत मुलांच्या शिक्षणाबाबत उक्त संदर्भांकित परिपत्रकांनुसार सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. स्थलांतरीत मुलांचे शिक्षण नियमित शाळेमध्ये त्यांच्या मूळ ठिकाणी व्हावे यासाठी योग्य नियोजन करून त्यामध्ये यंत्रणेस मोठ्या प्रमाणात यशसुद्धा प्राप्त झाले आहे. ज्या मुलांचे त्यांच्या पालकांसमवेत स्थलांतर झाले आहे अशा प्रत्येक मुलाची माहिती सरल या संगणकीय प्रणालीद्वारा संनियंत्रित करण्यात येत आहे. त्यामुळे मूल ज्या ठिकाणी स्थलांतरीत झाले आहे त्या ठिकाणी त्यास शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देता आली. तथापि, अशा प्रकारच्या सर्वच मुलांची माहिती यामध्ये उपलब्ध होत नाही. त्यासाठी यंत्रणेने स्थानिक पातळीवर याबाबत आणखीन काम करण्याची गरज आहे. यापुढे एकतर राज्यात एकही मूल स्थलांतरीत होणार नाही यासाठी कार्य केले जाईल. काही अपरिहार्य कारणाने एखादे मूल स्थलांतरीत झाले तर त्या मुलाची व स्थलांतरणाची संपूर्ण माहिती वरील संगणकीय प्रणालीद्वारे संनियंत्रित केली जाईल. जेणेकरून त्या मुलाच्या शिक्षणाचा हक्क अबाधित राहील. स्थलांतरणामुळे एकही मूल शाळाबाह्य होणार नाही याची दक्षता सर्व पातळीवरील यंत्रणेने घेणे आवश्यक आहे.

२) सर्व शिक्षा अभियानांतर्गत ६ महिन्याच्या हंगामी निवासी वसतिगृहातील ६,७३० मुलांसाठी व ६ महिन्याच्या अनिवासी वसतिगृहातील ६४,६१२ मुलांकरिता याप्रमाणे एकूण ७१३४२ मुलांकरिता प्रती मूल रू. १०,०००/- यानुसार दि. ०९/०२/२०१७ रोजी झालेल्या भारत सरकारच्या प्रकल्प मान्यता मंडळाच्या बैठकीत तरतूद मंजूर केली आहे. प्रती मूल रू. १०,०००/- याप्रमाणे मंजूर असलेल्या तरतुदीपैकी प्रती मूल रू. १,५००/- याप्रमाणे तरतूद राज्य स्तरावर राखीव ठेवण्यात येत आहे. याबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील. राज्यस्तरावर राखून ठेवण्यात आलेल्या निधीच्या विनियोगानंतर जे.व्ही. द्वारे खर्च सर्व जिल्हा परिषद व महानगरपालिकांना या कार्यालयाद्वारे स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

३) राज्यात सध्या डिजीटल शाळा, तंत्रस्नेही शिक्षक, प्रगत शाळा, स्पोकन इंग्लिश, शाळा सिद्धी, समाज सहभाग, वाचन प्रेरणा दिवस यासारख्या चळवळी (Movements) सुरू आहेत. यातून साध्य होणाऱ्या परिणामांचा लाभ या मुलांनाही प्राप्त झाला पाहिजे. त्यादृष्टीने योग्य नियोजन करून कार्यवाही करण्यात यावी.

४) महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे यांचेकडून भाषा व गणित या विषयातील संकल्पना समृद्धीकरणासाठी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येत आहे. यामध्ये शैक्षणिक साहित्याच्या प्रभावी वापरातून प्रत्येक मूल निर्धारित संपादणूक पातळी गाठू शकेल याचे नियोजन करण्यात आले आहे. त्याचाही संबंधित शाळेतील शिक्षकांना व मुलांना लाभ मिळेल याची खात्री करावी.

५) मुलांच्या हंगामी वसतिगृहातील उपस्थितीसाठी यु-आयडी आधार आवश्यक राहील. त्यासाठी बायोमॅट्रिक / Facial Recognition यासारख्या प्रणालीचा वापर करण्यात यावा. या प्रणालीतील माहितीशिवाय विद्यार्थ्यांना दिले जाणारे लाभ व त्याकामी केला जाणारा खर्च ग्राह्य धरला जाणार नाही.




Jawahar Bal Bhavan, Netaji Subhash Marg, Charni Road, Mumbai - 400 004.
Tel. : 022-236 36 314, 236 79 267 Fax : 022-236 36 315 Email : mpspmah@vsnl.com, mpspmah@gmail.com

६) वितरित करण्यात येत असलेल्या प्रती मूल रु.८,५००/- या तरतूदीमधून विहित norms नुसार व प्रचलित नियमानुसार खर्च करण्यात यावा. केलेल्या सर्व खर्चाचे अभिलेखे जतन करण्यात यावे.

७) दिनांक ०९ जानेवारी, २०१७ च्या शासन परिपत्रकानुसार शाळाबाह्य मुलांच्या शिक्षणासाठी काम केलेल्या व परिणाम मिळालेल्या शिक्षकांना बालरक्षक म्हणून कार्य करण्याची संधी देण्याकरिता महाराष्ट्र विद्या प्राधिकरणाकडून ऑनलाईन लिंकद्वारे माहिती संकलित करण्यात आली. त्यानुसार या बालरक्षकांना समता मूलक विचारांच्या माध्यमातून शाळाबाह्य मुलांच्या समस्या सोडविण्यासाठी सक्षम करण्यात येणार आहे.

८) स्थलांतरीत मुलांच्या शिक्षणाशी संबंधित यशोगाथा त्यामध्ये केस स्टडीज्, व्हिडीओज्, Testimonials, इत्यादी उल्लेखनीय बाबींचे मराठी व इंग्रजीमध्ये दस्ताऐवजीकरण (Documentation) करून या कार्यालयास सादर करावे. जेणेकरून ते भारत सरकारच्या SSA Shagun या पोर्टलवर अपलोड करण्यासाठी सादर करण्यात येईल.

स्थलांतरीत होणारे पालक हे सामाजिककदृष्ट्या वंचित घटक आहेत. त्यांच्यासाठी शासनाच्या वेगवेगळ्या विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ बालकांच्या शिक्षणासाठी समन्वय करून मिळवता येईल. स्थलांतरण प्रवण बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक नियोजन, अंदाजपत्रक व कृती आराखडा संबंधित पातळींवर तयार करून त्याप्रमाणे अंमलबजावणी केल्यास राज्यातील स्थलांतरणामुळे बालकांच्या शिक्षणातील समस्यांवर आपल्या सर्वांच्या सहकार्याने ठोस उपाययोजना करता येतील.

**(नंद कुमार भा.प्र.से.)**
**राज्य प्रकल्प संचालक,**
**म.प्रा.शि.प., मुंबई.**

**प्रति,**

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
२) आयुक्त, महानगरपालिका (सर्व).

**प्रत : माहितीस्तव,**

१) मा. मंत्री, शालेय शिक्षण विभाग यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
२) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रत : माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव,**

१) आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) शिक्षण संचालक (प्राथमिक), प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) संचालक, महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे.
४) विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व विभाग.
५) प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, सर्व जिल्हे.
६) शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), जिल्हा परिषद (सर्व).
७) शिक्षण प्रमुख / शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी, महानगरपालिका (सर्व).